## प्रकरण - सातवे

## निष्कर्ष व शिफारसी

कामेरी गावातील तीन गटातील १२० शेतमजुरांच्या सर्वेक्षणाच्या आधारे खालील निष्कर्ष मांडता येतात.

१) बहुतेक सर्व शेतमजूर कामेरी गावचेच आहेत. शेतमजूर कुटुंब प्रमुखांपैकी खंडकरी शेतमजुरांमध्ये अशिक्षिततेचे प्रमाण जास्त आहे. त्यामानाने अल्पभूधारक शेतमजूर कुटुंबप्रमुखामध्ये सुशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. एकूण शेतमजूर कुटुंबप्रमुखात साक्षरतेचे प्रमाण मागील पिढीपेक्षा जास्त आहे. तौलनिकदृष्टया अल्पभूधारक शेतमजुर कुटुंबप्रमुखात शैक्षणिक प्रगती झालेली आहे.

अल्पभूधारक व खंडकरी शेतमजुरांकडे कसण्यासाठी फारच अल्प जमीन आहे. फक्त ३.६ टक्के शेतमजूर कुटुंबांकडे कसण्यासाठी एक हेक्टरपेक्षा जास्त जमीन आहे. सर्व जमीन कोरडवाहू आहे. शेतमजुरांमध्ये आंतरपिढी गतिशीलता पाच टक्क्यांइतकी कमी आहे. शेतमजुरांची जमीन त्यांच्या वडीलांकडे असलेल्या जमिनीपेक्षा कमी आहे. प्रगतीच्या काळात शेतक-यांकडील जिंदगी वाढण्याऐवजी कमी झाल्याचे आढळून येते.

पाच व्यक्तिंपर्यंतचे कुटुंब योग्य आकारमानाचे मानल्यास अल्पभूधारकामध्ये ७९.५६ टक्के, भूहीन शेतमजुरामध्ये ७२.७२ टक्के व खंडकरी शेतमजुरात ८० टक्के कुटुंबे योग्य आकाराची आहेत. शेतमजुरांच्या कुटुंबातील सर्व व्यक्तिंच्या शिक्षणाचा विचार करता असे दिसून येते की, पुरुषांमध्ये शिक्षितांचे प्रमाण जास्त आहे. महाविदयालयीन शिक्षणात

... १६६/-

फक्त मुलेच आहेत. मुलींना प्राथमिक शिक्षणापलिकडे संधी मिळत नाही. शेतमजुरांपैकी स्वत:चे घर असणा-यांचे प्रमाण अल्पभूधारकात जास्त आहे. तर खंडकरी शेतमजुरात कमी आहे.

२) भूहीन शेतमजुरांना शेतावरील मजूरीपासून अल्पभूधारक व खंडकरी शेतमजूर यांच्या तुलनेने जास्त उत्पन्न मिळते. भूहीन शेतमजुरांच्या कुटुंबातील स्त्रिया व मुले-मुली यांचे मजूरीपासून उत्पन्न मिळविण्याचे प्रमाण कमी आहे. एकूणच शेतमजुरांना शेतीवर रोजगाराच्या संधी कमी उपलब्ध असतात. कामेरी गावातील शेतमजुरांना वर्षाला साधारणपणे २५० ते ३०० दिवस काम मिळते. ग्रामीण मजूरी पहाणी मंडळाच्या अहवालाप्रमाणे (१९६३-६५) शेतमजुरांना वर्षाला २७७ दिवस काम मिळत असे.

शेतमजुरांना किमान वेतन कायदयाने ठरविलेल्या वेतनापेक्षा कमी वेतन मिळत असते. स्त्रिया व मुलांना पुरुषांपेक्षा कमी वेतन मिळते. स्त्री मजूरांना तर मुलांपेक्षाही कमी वेतन मिळते. खंडकरी शेतमजूर वगळता अल्पभूधारक व भूहीन शेतमजुरांचा बहुतेकांचा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असतो. अल्पभूधारक शेतमजूर कुटुंबापैकी ४८ टक्क्यांचा व भूहीन शेतमजूर कुटुंबापैकी ७५ टक्क्यांचा खर्च त्यांच्या उत्पन्नात भागत नाही.

३) सर्वेक्षण केलेल्यापैकी ८९ टक्के शेतमजूर व्यसनाधीन आहेत. पान-तंबाखू व दारु ही महत्वाची व्यसने होत. व्यसनावर खर्च करणा-यांपैकी ४० टक्के शेतमजुरांच्या एकूण खर्चाच्या ७ टक्के भाग व्यसनावर खर्च होतो. वैदयकिय खर्च अतिशय अल्प आहे. ३१.६७ टक्के शेतमजूर शिक्षणावर अजिबात खर्च करीत नाहीत. एकूण खर्चाचा जवळजवळ साठ टक्के भाग अन्नधान्यावर खर्च होतो. शेतमजुरांच्या खर्चाची पातळी जशी वाढत जाते तशी अन्नधान्यावरील खर्चाचे एकूण खर्चाशी असलेले प्रमाण कमी होत जाते.

... १६७/-

४)   जवळ जवळ ७७ टक्के शेतमजूर कर्जबाजारी आहेत· या ९२ शेतमजुरांनी विविध मार्गांनी १५१ कर्जे घेतलेली आहेत· ग्रामीण भागात पतपुरवठ्यात सावकार अजूनही महत्वाची भूमिका बजावीत असताना दिसतात· बिनमुदत कर्जे एकूण कर्जाच्या ७१ टक्के आहेत· शेतमजुरांनी सावकाराकडून घेतलेल्या कर्जापैकी २० कर्जे ६० टक्क्यांपेक्षा जास्त व्याज दराची आहेत· शेतमजुरांच्या उत्पन्नाच्या वाढत्या पातळीबरोबर कर्ज घेणाऱ्यांचे व कर्जाच्या रकमेचे प्रमाण वाढत जात असताना दिसते· कर्जाची वेळेवर परतफेड होण्याचे प्रमाण कमी उत्पन्न गटात अधिक आहे· भूहीन व खांडकरी शेतमजुरांमध्ये थकबाकीचे प्रमाण अधिक आहे· एकूण - शेतमजुरांच्या कर्जाच्या थकबाकीचे प्रमाण ८० टक्के आहे· शेतमजुरांचे उत्पन्न कमी असणे हे थकबाकीचे प्रमुख कारण आहे·

५)   सर्वेक्षण केलेल्या शेतमजुरात बचत करणाऱ्यांचे प्रमाण ३५ टक्के आहे· बचत करणाऱ्यांपैकी ७८ टक्के बँकेत बचत करतात, १० टक्के पोस्टात व २१ टक्के भिशीत बचत करतात· शिक्षणाचा बचत प्रवृत्तीवर परिणाम झाल्याचे दिसून येत नाही· मध्यम आकाराच्या कुटुंबात लहान व मोठ्या आकारमानाच्या कुटुंबाच्या तुलनेत बचत करणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे·

या विवेचनावरुन शेतमजुरांच्या विदारक आर्थिक स्थितीचे दर्शन होते· आर्थिक विकासाच्या काळात शेतमजुरांची दुरावस्था का व्हावी हे नियोजनाचे अपयश होय· जास्त कष्ट करुन, कुटुंबाचे आकारमान मर्यादित ठेवून, काबाडकष्ट उपसून मुलांना शिक्षण देवून प्रगतीच्या प्रवाहात सामील होण्याचा ते प्रयत्न करीत असले तरी ते भोवऱ्यात सापडलेले दिसतात· यादृष्टीने त्यांची परिस्थिती सुधारावी म्हणून काही सूचना मांडता येतात·

## शिफारसी

शेतमजुरांची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती सुधारावी म्हणून सरकारने अनेक उपाय योजले आहेत. रचनात्मकदृष्टया हे उपाय योग्य आहेत. असे असूनही त्यांच्या परिस्थितीत फरक पडत नाही, सुधारणा होत नाही हे विशेष होय. याचे महत्वाचे कारण असे की, या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत त्रुटी आहेत. या त्रुटी दूर करुन या कार्यक्रमांची कार्यक्षमतेने अंमलबजावणी करावी अशीच पहिली सूचना येथे मांडाविशी वाटते. शेतमजुरांबद्दल, गरीबांबद्दल आस्था, कणव असणा-या सेवकांचा विशाल गट तयार करुन या योजनांची अंमलबजावणी करणे फार महत्वाचे आहे. उदाहरण म्हणून किमान वेतनाच्या अंमलबजावणीचा दाखला देता येईल. सरकारी अधिका-यांच्या अनास्थेमुळे आजही शेतमजुरांना शासनाने ठरवून दिलेल्या वेतनापेक्षा कमी वेतनावर समाधान मानावे लागते.

दुसरी सूचना अशी की, शेतमजुरांना पुरेसा रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने बाजारपेठेत आवश्यक असलेली कौशल्ये त्यांना शिकविली पाहिजेत. बेकारी व दारिद्र्य या दोन्ही एकाच समस्येच्या दोन बाजू आहेत. बेकारी निर्मुलनातूनच दारिद्र्य निर्मुलन शक्य आहे. जी जिंदगी सांभाळण्याचे, देखभाल करण्याचे प्रशिक्षण शेतमजुरांना मिळालेले नाही ती जिंदगी शेतमजुरांना अथवा गरीबांना पुरवून भांडवलाच्या - अपव्ययाशिवाय पदरी काही पडणार नाही म्हणून समाजाला उपयोगी असलेले, बाजारपेठेत मागणी असलेले कौशल्य त्यांना शिकवून त्यांच्या सेवा विक्रीयोग्य केल्या पाहिजेत. अशा कौशल्य शिकविणा-या संस्थांचे

देशभर जाळे विणून त्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेली साधनसंपत्ती व त्यातून निर्माण होणारी कौशल्याची मागणी पूर्ण करणारी कौशल्ये शिकविली जावीत.

तिसरी सूचना अशी की ग्रामीण भागात शेतीतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करण्याचा कार्यक्रम तयार करून तो कार्यक्षमतेने व वेळेच्या बंधनात अमलात आणला पाहिजे. हस्तव्यवसाय, लघुउद्योग, जोडउद्योग मोठ्या संख्येने उभे केले पाहिजेत. शेतमजुरांच्या समस्येचे उत्तर शेतीक्षेत्रात नसून शेतीतर क्षेत्रात आहे. शेतीतर क्षेत्र जितके सक्षम होईल तितका शेतीव्यवसाय बळकट होईल.

महत्वाचे म्हणजे नवीन कार्यक्रमांपेक्षा नवीन उपायांपेक्षा कार्यक्षम, देशप्रेमी व व्यवहारी शासनाची आज जास्त जरुरी आहे.

कामेरी गावातील शेतमजूर प्रातिनिधिक आहे. त्याच्या समस्या, त्याची स्थिती देशातील छोट्यातील शेतमजुराची स्थिती आहे. त्यादृष्टीने या सर्वेक्षणाचे व केलेल्या सूचनांचे महत्व आहे. या सूचना अमलात आणल्यास तात्काळ या समस्यांचे निवारण होणार आहे असे नाही पण योग्य दिशेने वाटचाल सुरु होऊन समस्येची उकल दृष्टीपथात येईल.

====XXXX====